सं. फौजदारी प्रकरण क्र. १०६७/२०२२

महाराष्ट्र सरकार –वि– विनोद

निशाणी क्र. ११

सरकार तर्फे साक्षीदार क्र. ०१

मी याद्वारे शपथपुर्वक निवेदन करतो की,

माझे नावः राहुल

वडीलांचे नावः दगडुबा

आडनावः बोर्डे

माझे वयः ३८ वर्ष, व्यवसायः शेती,

राहणारः पिंपळगाव रेणकाई, ता. भोकरदन, जि. जालना.

**<u>सरतपासणी सरकारी वकिल श्री ए.एन.गवळी यांच्याद्वारे</u>**

०१. मी इयत्ता दहावी पर्यत शिकलो आहे. सरुबाई बोर्डे या माझ्या आजी होत्या. दि. २८/१०/२०२२ रोजी सरुबाई सकाळी साडे नउ वाजण्याच्या सुमारास अवघडराव सावंगी ते पारध जाणा–या रस्त्यावर पायी जात असताना सावंगी ते पारध या दिशेने जाणा–या चार चाकीने सरुबाई यांना पाठीमागुन धडक दिली. त्यानंतर माझ्या घरी येवुन घडलेली घटना शिवा शिंदे यांने मला सांगितली.

०२. त्यानंतर मी, माझा चुलत भाउ राजु व दिनेश असे घटनास्थळी गेलो. त्या ठिकाणी मी पाहिले असता, सरुबाई या रस्त्यावर पडल्या होत्या. तिथे शेजारी असलेल्या खाजगी दवाखाण्यामध्ये मी सरुबाई यांना नेले. त्या ठिकाणी डॉ. सोनोने यांनी त्यांना मयत घोषीत केले. त्यानंतर सरुबाई यांचे प्रेत पंचनाम्यासाठी पिंपळगाव रेणुकाई येथील सरकारी दवाखाण्यात नेले. पोलिसांनी पंचनामा झाल्यानंतर प्रेत आमच्या ताब्यात दिले. त्या बाबत मी पावती लिहुन दिली होती. साक्षीदारास दि. २८/१०/२०२२ रोजीची पावती दाखविण्यात आली. त्याखाली सही असल्याचे व त्यामध्ये नमुद मजकुर बरोबर असल्याचे साक्षीदाराने सांगितले. सबब सदरच्या पावतीस **नि. १२** देण्यात येते.

०३. दि. २९/१०/२०२२ रोजी मी पोलिस ठाण्यात फिर्याद दिली. साक्षीदारास दि. २९/१०/२०२२ रोजीची फिर्याद दाखविण्यात आली. त्या खाली सही असल्याचे व त्या मधे नमुद मजकुर बरोबर असल्याचे साक्षीदाराने सांगितले सबब त्यास **नि. १३** देण्यात येते.

तसेच दि. २९/१०/२०२२ रोजीची संगणीकृत फिर्याद देखील मी दिली होती. त्याखाली माझी सही आहे त्यामध्ये नमुद मजकुर बरोबर आहे. सबब त्यास **नि. १४** देण्यात येते. त्याच दिवशी पोलिसांनी पंचनामा केला होता. त्यावेळी पंच म्हणुन अमोल सुर्यवंशी व फकीरा लोखंडे उपस्थित होते. पोलिसांना घटनास्थळ मी दाखविले.

०४. दि. ०१/११/२०२२ रोजी पोलिसांनी माझा पुरवणी जबाब नोदविंला. सदर गाडीचा क्रं. एम.एच.१० सी.एक्स.९५५१ हा होता. गाडी आरोपी चालवत होता. सदरची माहिती मला शिवा शिंदे, राजु बोर्डे व दिनेश बोर्डे यांनी दिली होती. शिवा शिंदे याने मला फिर्याद देते वेळी सदरची बाब न सांगण्याचे कारण म्हणजे शिवा शिंदे त्या वेळी घाबरला होता. शिवा शिंदे यांने दिलेल्या माहितीनुसार आरोपी वेगाने गाडी चालवत होता व अपघात होवुन देखील तो तेथे थांबला नाही. साक्षीदारास दि. ०१/११/२०२२ रोजीचा पुरवणी जबाब दाखविण्यात आला. त्या खाली सही असलयाचे व त्यामध्ये नमुद मजकुर बरोबर असल्याचे साक्षीदाराने सांगितले. सबब त्यास **नि. १५** देण्यात येते. अपघात हा क्रीड गाडी चालकाच्या चुकीमुळे झाला होता. मी ती गाडी पोलिस ठाण्यात पाहिली.

०५. मला गाडीचे फोटो दाखविल्यास मी ओळखु शकेन. साक्षीदारास याकामी काढण्यात आलेले चार फोटो दाखविण्यात आले. ते गाडीचे असल्याचे साक्षीदाराने सांगितले. सबब त्यास ओळखीसाठी **आर्टीकल अ** देण्यात येते.

सरतपास पुर्ण.

**<u>उलटतपास आरोपींतर्फे विधीज्ञ श्री. बारोटे यांच्याकडून</u>**

०६. मी सकाळी दहा वाजन्याच्या सुमारास शेतीकामासाठी घरातुन बाहेर निघतो. माझ्या घरी माझ्या सोबत राजु, दिनेश व माझे कुंटुंब होते. हे म्हणणे खरे नाही की, माझे घर ते डॉ. सोनोने यांचा दवाखाना अंदाजे एक ते दीड किलोमीटर अंतरावर आहे. मी पोलिसांना सरुबाई यांचे वय दर्शविणारा कागदोपत्री पुरावा दिला नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, साक्षीदार दिनेश चे वय आज रोजी ४८ वर्षे आहे. हे म्हणणे खरे नाही की, तथाकथित घटनेवेळी सरुबाई यांचे वय ९० वर्षे होते. हे म्हणणे खरे नाही की, सरुबाई यांना चष्मा होता व चालण्यासाठी त्या काठीचा आधार घेत होत्या.

०७.   दवाखान्यात  जाताना माझ्या सोबत दिनेश बोर्डे होता. तथाकथीत घटनेवेळी रस्ता हा नव्याने तयार करण्यात आला होता. हे म्हणणे खरे नाही की, तथाकथीत घटनास्थळाच्या बाजुस लोखंडी एंगल व खडी, दगड होते. हे म्हणणे खरे नाही की, तथाकथीत घटनास्थळाच्या बाजुस दोन खड्डे देखील होते. माझ्या म्हणण्याप्रमाणे शिवा शिंदे याने मला घटने बाबत माहिती सकाळी नउ वाजुन पंचेचाळीस मिनीटानी दिली. माझ्या म्हणयाप्रमाणे मी व माझ्या घरातील लोक लगेचच घटनास्थळी गेलो. हे म्हणणे खरे नाही की, आम्ही प्रथमताः डॉ.सोनोने यांच्याकडे गेलो. सरुबाई यांना घटनास्थळावरुन दिनेश बोर्डे यांने उचलले. मी देखील त्यास मदत केली. घटनास्थळी सरुबाई यांच्या बांगडया पडल्या नव्हत्या.

०८.  हे म्हणणे खरे नाही की, तथाकथीत घटनास्थळावरुन दररोज शंभर ते दीडशे वाहनांची ये–जा होते. फिर्यादी मध्ये मी आरोपीचे नाव नमुद केले नाही. या कामातील सर्व साक्षीदार माझे नातेवाईक आहेत. तथाकथीत घटनेवेळी सरुबाई नेहमीच्या सवयीप्रमाणे फिरण्यास गेली होती. हे म्हणणे खरे नाही की, घटनास्थळाच्या आजुबाजुस बरीच दुकाने, राहती घरे व जनावाराचा गोठा आहे. घटनास्थळाच्या बाजुला मेडीकल व दवाखाना आहे. सदर दवाखाना व मेडीकल मध्ये सी.सी.टीव्ही कॅमेरा कार्यरत आहे.

०९.   मी पोलिसांना सी.सी.टीव्ही कॅमेरा बाबत सांगितले नव्हते. मी अपघात होताना प्रत्यक्ष पाहिलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, फिर्याद दिल्यानंतर मी पुन्हा पोलिस ठाण्यात गेलो नाही.  माझ्या सरतपासातील मजकुर की, शिवा शिंदे यांने भितीपोटी मला गाडी क्रंमाक व आरोपीचे नाव सांगितले नाही हा मजकुर बरोबर आहे. हे म्हणणे खरे आहे की, मला गाडीचे नाव व गाडीचा क्रंमाक याबाबत माहिती इतर व्यक्तीनी  दिली म्हणुन झाली.

१०.   मी पोलिसांना तोंडी फिर्याद दिली होती.  नि. १४ कडील प्रथम खबरी अहवालामध्ये कलम तीन मध्ये नमुद मजकुर हा योग्य नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी राजु बोर्डे यांच्या ट्रॅक्टरवर काम करतो. हे म्हणणे खरे नाही की, आम्ही सरुबाई यांचे प्रेत डॉ. सोनोने यांचे कडे नेण्यापुर्वी इतर लोकांनी ते प्रेत डॉ. सोनोने यांचेकडे नेले होते. सरुबाई यांचे प्रेत सकाळी दहा ते सव्वा दहा वाजण्याच्या सुमारास आमच्या घरी आणले. सदरचे प्रेत सरकारी दवाखाण्यामध्ये दुपारी दोन वाजण्याच्या सुमारास नेले. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने गाडी निष्काळजीपणे चालविली नाही. हे म्हणणे खरे नाही की आरोपीने सरुबाई यांना धडक

दिली. माझ्या म्हणण्याप्रमाणे सरुबाई यांच्या डोक्यास पाठीमागील बाजुस मार होता.

११. हे म्हणणे खरे नाही की, अपघात विमा मिळण्यासाठी मी आरोपीचे नाव घेत आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी व अपघात यांचा काहीही संबंध नाही. हे म्हणणे खरे नाही की, सरतपासातील मजकुर खोटा आहे. हे म्हणणे खरे नाही की, खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, आर्टीकल अ कडील फोटो आरोपीच्या गाडीचे नाहीत.

उलटतपास पुर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

दिनांकः १४.०१.२०२६

(मयुरेश आर. काळे)
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, भोकरदन